+IC

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी - २२६१७९६९ फॅक्स-२६९०००७
E-mail: desk18@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in

तात्काळ - स्पीड पोस्ट /ई-मेलद्वारे

क्रमांक: १८ /तंशिसं /डीबीटी /२०१८-१९/ २८०
दिनांक : ११/०६/२०१९

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता महाडीबीटी पोर्टलद्वारे राबविण्यात येत असलेल्या योजनांसाठी अर्ज करण्यासाठी व तपासणी करण्यासाठी देण्यात आलेली मुदतवाढ....

संदर्भ :- १) या संचालनालयाचे पत्र क्र.:१८/तशिसं/ईबीसी/डीबीटी/२०१९/१०४, दि. ०२/०३/२०१९
२) या संचालनालयाचे पत्र क्र.: १८/तशिसं/ईबीसी/डीबीटी/२०१८-१९/२३६ दि. २० /०५ /२०१९

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता महाडीबीटी पोर्टलद्वारे राबविण्यात येत असलेल्या योजनांसाठी संदर्भीय पत्र क्र.१ व २ नुसार विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी व संस्थांना अर्जांची ऑनलाईन तपासणी करुन अर्ज निकाली काढण्यासाठी मुदतवाढ देण्यात आलेली होती. तरीही काही विद्यार्थ्यांकडून विहीत मुदतीत अर्ज न भरल्याने तसेच ऑनलाईन भरलेल्या अर्जांची तपासणी संस्था स्तरावर प्रलंबित असल्याने, शासनाकडून अर्ज भरण्यासाठी व प्रलंबित अर्जाच्या तपासणी करुन निकाली काढण्यासाठी दि. ३०.०६.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

तरी या पत्राद्वारे सर्व विभागीय कार्यालयांना सूचित करण्यात येते की, आपल्या अखत्यारित येणाऱ्या सर्व संस्थांना व संस्थांमार्फत सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात यावे की ज्या पात्र विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर अद्याप अर्ज केलेला नाही त्यांनी विहित मुदतीत म्हणजे दि. ३०.०६.२०१९ पर्यत संपूर्ण अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावे व संस्थांनी विद्यार्थ्यांसाठी याबाबतची सूचना संस्थेच्या दर्शनी सूचना फलकावर जाहिर करावी व कोणताही पात्र विद्यार्थी लागू असलेल्या संबंधित योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही याची दक्षता संस्थेच्या प्राचार्यांनी स्वत: घ्यावी. तसेच, संबंधित संस्थांनी त्यांच्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन ऑनलाईन प्राप्त झालेल्या/होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे अर्जांची ऑनलाईन पध्दतीने तपासणी करुन दि. ३०.०६.२०१९ पर्यंत पुढील कार्यवाहीसाठी ऑनलाईनरित्या पाठवावे अन्यथा या तारखेनंतर प्रलंबित राहिलेले अर्ज सिस्टिमद्वारे नामंजूर करण्यात येतील व नामंजूर अर्जांची सर्वस्वी जबाबदारी संस्थेच्या प्राचार्यांची राहिल तसेच यानंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही याबाबतची नोंद विद्यार्थी / संस्थांनी घ्यावी. विभागीय कार्यालयांनी त्याबाबतच्या सूचना संबंधित संस्थांना द्याव्यात ( संस्थांना पाठविलेल्या पत्राची एक प्रत संचालनालयाला पाठविण्यात यावी.)

तसेच सर्व विभागीय कार्यालयांनादेखील सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन संस्थामार्फत ऑनलाईन प्राप्त झालेल्या/होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे अर्जांची ऑनलाईन पध्दतीने तपासणी करुन दि. ३०.०६.२०१९ पर्यंत पुढील कार्यवाहीसाठी ऑनलाईनरित्या पाठवावे अन्यथा या तारखेनंतर प्रलंबित राहिलेले अर्ज सिस्टिमद्वारे नामंजूर करण्यात येतील व नामंजूर अर्जांची सर्वस्वी जबाबदारी विभागीय कार्यालयाची राहिल याची नोंद घ्यावी.

( डॉ. अभय वाघ )
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.

टीप - अंतिम तारखेपर्यंत न थांबता वंचित राहिलेल्या पात्र विद्यार्थ्यांनी अर्ज भरुन घ्यावे व संस्था / विभागीय कार्यालय यांनी त्यांच्याकडे प्राप्त होणारे अर्ज अंतिम तारखेपर्यंत न थांबता तपासणी करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठवावे.

---

क्र.तंशिसं/विकाना/ईबीसी/२०१९/ 1775
दिनांक:— 12 JUN 2019

संचालक/प्राचार्य,
सर्व पदव्युत्तर पदवी, पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

शैक्षणिक वर्ष २०१८—१९ करिता महाडीबीटी पोर्टलद्वारे राबविण्यांत येत असलेल्या योजनांसाठी अर्ज करण्यांकरिता तसेच तपासणी करण्यांकरिता वरिल पत्रात नमूद केल्याप्रमाणे मुदतवाढ देण्यांत आलेली आहे. तरी सर्व संस्थांनी पत्रात दिलेल्या निर्देशानुसार त्वरित कार्यवाही करावी.

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,
नागपूर.

प्रत :— मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांना माहितीकरिता मानार्थ सादर.